# नियमित दिवाणी दावा क्र.२३५/२०२४ मधील निशाण क्र.१९ खालील आदेश

[ CNR No.MHKO090005682024 ]

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ ते ६ यांनी विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा याकरिता सादर केला आहे. प्रतिवादी क्र.३ ते ६ यांचे थोडक्यात असे कथन आहे की, ते वयोवृध्द असून अडाणी आहेत तसेच तहसिल रेकॉर्डमधून वेळेत कागदपत्रे उपलब्ध न झालेने त्यांना वकिलांना भेटून वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे कैफियत दाखल करणेस विलंब झाला. तरी प्रतिवादी क्र.३ ते ६ विरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादीमार्फत तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला. वादी यांनी असे कथन केले की, अर्जातील मजकूर खोटा व बेकायदेशीर आहे. तसेच त्यातील कारणे ही संयुक्तिक नाहीत. झालेला विलंब हा गैरवाजवी आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र.२ ने केलेला आदेश अधिकारक्षेत्राबाहेरचा असून त्याआधारे प्रतिवादी क्र.३ ते ६ यांनी त्या आदेशाचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीमध्ये नवीन रस्ता करु नये याकरिता हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल करणेत आला आहे. मान्यत: प्रतिवादी

क्र.३ ते ६ यांना कैफियत दाखल करणेस विलंब झाला असलेने त्यांचेविरुध्द विना कैफियतचा आदेश पारीत झाला आहे. परंतू प्रकरणाचा गुणदोषावर निकाल होणेकरिता दोन्ही पक्षकारांची बाजू न्यायालयासमक्ष येणे क्रमप्राप्त आहे. प्रस्तुतचा दावा हा पुराव्याचे कामी अजून लागला नसल्यामुळे विना–कैफियतचा आदेश रद्द केलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. झालेल्या विलंबास योग्य तो दंड आकारलेस न्यायसंगत ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे मात्र) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम ही सचिव, तालुका विधी सेवा प्राधिकरण, गडहिंग्लज यांना अदा करणेत यावी.

२) खर्चाची रक्कम अदा झालेनंतर प्रतिवादी क्र.३ ते ६ यांना कैफियत दाखल करणेस परवानगी देणेत येत आहे.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.04.09 11:46:34 +0530

स्थळ : गडहिंग्लज.

दिनांक : ०८.०४.२०२५.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज